## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**स्मरणपत्र क्र.१**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करणे व प्रत्येक शाळा, महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करण्याबाबत विधान परिषद ठराव - १५६ मांडला होता. सदर ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठाची माहिती संचालनालयास कळविण्याबाबत मा.शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी क्र.एनजीसी/२०१६/विपठ१५६/ मवि-१/८३७३, दि.१४ जुलै, २०१६ पत्रान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने एन.सी.सी. / एम.सी.सी. चा अभ्यासक्रम ज्या-ज्या महाविद्यालयांमध्ये सुरू आहे त्यांनी सदर अभ्यासक्रमाबाबतची माहिती विद्यापीठ कार्यालयास तात्काळ कळविण्याबाबत तसेच, ज्या महाविद्यालयांमध्ये सदरचा अभ्यासक्रम सुरू नाही त्या महाविद्यालयांनी "निरंक " अहवाल कळविण्याबाबत या कार्यालयाच्या संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/९१, दि.१२ ऑगस्ट, २०१६ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. तथापि, सदरबाबत काही महाविद्यालयांकडूनच माहिती प्राप्त झाली आहे. सदरची माहिती शासनास पाठवावयाची असल्याने प्रथम प्राधान्याने देण्यात यावी. तसेच वेळोवेळी विद्यापीठ कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या परिपत्रकांवर विहित वेळेत कार्यवाही करून त्याचा अहवाल महाविद्यालयांनी वेळेत विद्यापीठ कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ १०१
दि. 2 9 AUG 2016